# दवडू नका क्षण हे मोलाचे!

१९७१ ची गोष्ट. मला लंडनच्या प्रख्यात रॉयल इन्स्टिट्यूशनकडून व्याख्यानाचे आमंत्रण आले आणि मी हरखून गेलो. ही तीच संस्था- जिथे एकोणिसाव्या शतकात वैज्ञानिक मायकेल फॅरडे आपल्या सरल-सुंदर भाषणांनी विज्ञानाचे रंजक पैलू जनतेपुढे मांडत असे. अनेक प्रख्यात वैज्ञानिक वक्त्यांनी ज्या शुक्रवार सायंकाळच्या व्याख्यानमालेत भाषणे दिली होती, त्याच मालिकेत मलाही व्याख्यानपुष्प गुंफायचे होते.

या व्याख्यानमालेची परंपरा ब्रिटनसारख्या परंपराप्रिय देशाला शोभण्यासारखी होती. वक्त्याने पांढरा 'बो-टाय' व 'टेलकोट'चा 'इव्हिनिंग ड्रेस' घालायचा, तर श्रोत्यांनीही काळा डिनरसूट. पण खुद्द व्याख्यानाचे सोपस्कारही विशेष होते. रात्री नवाच्या ठोक्याला वक्त्याने व्याख्यानालयात प्रवेश करायचा आणि बोलायला सुरवात करायची. त्याचे स्वागत, ओळख वगैरे प्रकार नाही. वक्त्याबद्दलचे माहितीपत्रक श्रोत्यांना आगाऊच उपलब्ध केले असल्याने त्याची गरज नव्हती; पण त्याहून अवघड गोष्ट वक्त्याच्या दृष्टीने ही, की त्याने दहाच्या ठोक्याला व्याख्यान आवरले पाहिजे : आधी नाही, नंतर नाही! कित्येक मोठे वक्ते या 'टेन्शन'मुळे हादरून जायचे. एक वक्त्या आयत्या वेळी घाबरून पळून जाईल, अशी शंका आल्याने संस्थेच्या संचालकांनी त्याला एका खोलीत कोंडून ठेवले व नऊच्या सुमाराला बाहेर काढले. संचालक सर जॉर्ज पोर्टर यांनी मला ती खोली दाखवली!

आणि दहा वाजता बरोबर भाषण संपल्यावर वक्त्याने व्याख्यानालयातून बाहेर पडायचे. आभारप्रदर्शन नाही! बाहेरून त्याला श्रोत्यांच्या टाळ्या ऐकायला मिळतात, ती आभाराची पावती.

या पद्धतीत व्याख्यानाचा पुरेपूर एक तास वक्त्याला मिळतो. आणि दहाला व्याख्यान संपवायचे म्हटले, की श्रोत्यांच्या वेळेचीही कदर केली जाते.

आता भारतात व्याख्यान द्यायचे

## वेळेचा किती हा अपव्यय!

■ वैज्ञानिक संस्थांनी आपल्या आचरणाने वेळेचे महत्त्व जाणतो, हे दाखवून दिले पाहिजे

■ अनेकदा खास निमंत्रित वक्त्याच्या भाषणालाच न्याय मिळत नाही

■ वेळेचा अपव्यय हे आपल्या सामाजिक रक्तात भिनलेले

असल्यास काय अनुभव येतो? प्रथम वक्ता- श्रोतृगण यांच्या स्वागतावर दहा मिनिटे तरी जातात. मग यजमान संस्थेचे कार्यवाह संस्थेची माहिती देण्यात दहा ते पंधरा मिनिटे घालवतात. त्यानंतर वक्त्याचा परिचय. 'जरी मान्यवर वक्ते बहुपरिचित आहेत, तरी त्यांची थोडक्यात माहिती देतो' असे म्हणत कमीत कमी दहा मिनिटे परिचयासाठी खर्च केली जातात. ती बिनचूक असणे क्वचितच घडते. मी स्वतः लिहून दिलेल्या माहितीचा अतिशयोक्तिपूर्ण विपर्यास झालेला मी पाहिला आहे. व्याख्यानाला वेगळे अध्यक्ष असतात. ते आपण काय बोललो त्याचा (चुकीचा) सारांश सांगणार, याची धास्ती मनात असताना मी व्याख्यानास प्रारंभ करतो. आधीच या इतर सोपस्कारांत तीस-चाळीस मिनिटे व 'कॉम्पेअर' बाई असल्यास आणखी दहा-पंधरा मिनिटे- गेली असल्याने श्रोत्यांच्या सहनशीलतेचा तरी अंत किती पाहायचा म्हणून मी तासभराचे भाषण काटछाट करून चाळीस मिनिटांत संपवतो. पुढे अध्यक्षांचा परिचय, त्यांचे भाषण आणि नंतर आभारप्रदर्शन, यांत अर्धा तास जातोच; पण आभारप्रदर्शन (अध्यक्षांपासून सतरंजी पुरवणाऱ्यापर्यंत) चालू असताना श्रोत्यांचे 'बाहर चलो' चालू झालेले असते.

रॉयल इन्स्टिट्यूशनमध्ये मला व्याख्यानासाठी दिलेल्या एक तासापैकी शंभर टक्के वापरायला मिळाले, तर भारतीय पद्धतीत एका तासाच्या भाषणासाठी दोन तास तरी खर्च होतात आणि माझ्या पदरी येतो त्याचा तेहतीस टक्के वेळ. मनात प्रश्न येतो, की हे श्रोते आवर्जून हजर राहिले, ते माझे व्याख्यान ऐकण्यासाठी, का त्याला मागेपुढे जोडलेल्या शेपट्यांसाठी?

मला २००४ मध्ये 'जानसेन मेडल' मिळाले, तेव्हा २००१, २००२ व



२००३ या वर्षांतील मेडल्सही देण्यात आली. तो कार्यक्रम आठवतो. आमची ओळख प्रत्येकी ४-५ मिनिटांत करून देण्यात आली व आम्ही प्रत्येकी ४-५ मिनिटांची स्वीकृतीची भाषणे केले. ४०-४५ मिनिटांचा कार्यक्रम संपल्यावर फ्रेंच प्रथेप्रमाणे ड्रिंक्स आणि



**डॉ. जयंत नारळीकर**

लहान पेस्ट्रीवजा आयटेम्स. असेच पुरस्कार सोहळे भारतात झाले तर दीर्घ व्याख्यानबाजीत दोन-अडीच तास नक्कीच गेले असते.

एखाद्या भारतीय विद्यापीठात आयोजित परिसंवादाचे रूप कसे असते? व्यासपीठावर पाच तरी 'मान्यवर' पाहिजेत, असा अलिखित नियम आहे. त्यांत कुलगुरू पाहिजेतच, मग त्यांच्या ज्ञानाचा परिसंवादाशी सुतराम संबंध नसला तरी! ते बिचारे परिसंवादाच्या विषयावर (दुसऱ्या कोणी) तयार केलेले टिपण वाचतात. सुदैवाने व्यासपीठावरील प्रत्येकाने बोललेच पाहिजे, असा नियम नाही; पण कुलसचिव व इतर काही 'महत्त्वाच्या'

व्यक्तींची परिसंवादाच्या आयोजनाला मदत मिळावी म्हणून आयोजकांनी त्यांना हा मान दिलेला असतो.

होमी भाभा यांनी 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च'मध्ये या सर्व कर्मकांडाला छाट मारली. भाषणापूर्वी पाच-दहा मिनिटांत वक्त्याची ओळख व आभारप्रदर्शन एकाच व्यक्तीने आगाऊच करून स्टेज वक्त्याच्या हवाली करायचे. हाच प्रघात 'आयुका'मध्ये पाळला जातो. 'आयुका'त घडणाऱ्या विविध परिसंवादाची सुरवात दोन-तीन मिनिटांच्या स्वागतपर भाषणाने होते. तेथे येणाऱ्या विद्यापीठीय बांधवांना ते पाहून चुकल्याचुकल्यासारखे वाटते. पण नेहमीच्या औपचारिक सत्रावर खर्च होणारी ६०-७० मिनिटे परिसंवादातल्या चर्चेसाठी मिळतात, हा फायदा त्यांच्या अंगवळणी पडतो. (स्टेजवरील विविध पाहुण्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात वेळ जातो, तो वेगळाच!)

मला वाटते, की वैज्ञानिक संस्थांनी; तसेच विज्ञानप्रसाराला वाहिलेल्या संस्थांनी, आपल्या आचरणाने आपण वेळेचे महत्त्व जाणतो, हे दाखवून दिले पाहिजे... पण दुर्दैवाने तसे घडत नाही. एका प्रसिद्ध स्वयंसेवी संस्थेच्या वार्षिक संमेलनात तर

अध्यक्षांची खैरात असते. संमेलनाच्य अध्यक्षांव्यतिरिक्त स्वागताध्यक्ष उद्घाटक, शिवाय संस्थेचे अध्यक्ष व्यासपीठावर असतात. हे कमीच झा म्हणून प्रमुख पाहुणे, अतिरिक्त प्रमुख पाहुणे स्थानिक गरजेनुसार असतात साहजिकच कार्यक्रम लांबतो आणि संमेलनाध्यक्षांची बोलायची वेळ येईपर्यंत श्रोत्यांची सहनशीलता संपुष्टा आलेली असते. आणि इतर (माझ्या मत सटरफटर) व्याख्यानबाजीमुळे ज्यांना खास निमंत्रण देऊन बोलावलेले असते त्यांच्याच भाषणाला न्याय मिळत नाही या संस्थेचा अध्यक्ष असताना मी ह प्रघात बदलण्याचा प्रयत्न केला होता पण तेव्हा व्यासपीठ गाजवून वेळेच अपव्यय करणे, हे जातीयवादाप्रमाणे आपल्या सामाजिक रक्तात भिनले असल्याचे आढळून आले. तेव्हा ह लेखही अरण्यरुदन ठरणार, याचं जाणीव आहे.

काही वर्षांपूर्वी क्योटोच्या मेट्रो स्टेशनांमध्ये काही ठिकाणी देवनागरी लिपीत एक संस्कृत श्लोक दिसला. त्याचा मथितार्थ असा : 'वेळ ही अत्यंत मोलाची! एकदा खर्च केली, की परत मिळत नाही... तेव्हा ती काळजीपूर्वक वापरा.' सामान्य जपानी माणूस हा श्लोक माहीत नसला तरी त्यातली शिकवण आचरणात आणतो. आणि आपण? व्यासपीठे आवाहनासाठी असतात, ती इतरांनी पाळायची, व्यासपीठावरील मानकऱ्यांनी नाहीच नाही, हे आपल्याला माहीत आहे!